Historicity Research Journal
Volume 2 | Issue 10 | June 2016

Impact Factor : 0.4521(UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

"पंचवार्षिक योजनांमधील महिला केंद्रीत नियोजन आणि महिला विकास "

सुनिता संतोष खडसे (बोर्डे)

इतिहास विभाग प्रमुख ,
श्रीमती सी.बी.शाह महिला महाविद्यालय, सांगली.

गोषवारा:

भारतीय लोकसंख्येचा अर्धा भाग असलेल्या स्त्रियांचे विकास प्रक्रियेतील स्थान व सहभाग निश्चित करणे हे नियोजनकारांपुढील एक फार महत्वाचे आव्हान आहे. २००१ च्या जनगणने नुसार स्त्रियांची एकूण संख्या ४९५.७४ कोटी (मिलियन) इतकी होती. देशाच्या एकूण लोसंख्येच्या प्रमाणात स्त्रियांची टक्केवारी एकूण ४८.३ टक्के इतकी होती. पुरूषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रियांना दुयमस्थानी ठेवल्यामुळे त्या विकासापासून वंचीत राहिल्या. सार्वजनिक क्षेत्र हे पुरूषांचे तर खाजगी क्षेत्र म्हणजे घर आणि त्यासंबंधीच्या जबाबदाऱ्या स्त्रियांच्या या समाजातील प्रस्थापित नियमांमुळे स्त्रिया शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार, वेतन, यापासून दूर फेकल्या गेल्या. परिणामी विकास प्रक्रियेची फळे त्यांच्यापर्यंत पोहचण्यास फार उशीर झाला. सत्तरच्या दशकामध्ये स्त्रियांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज जगभरातील सर्वच देशांना जाणवू लागली. भारतामध्ये स्त्रीप्रश्नांवर विशेष संशोधन व अभ्यास करण्यासाठी एका गटाची नेमणूक करण्यात आली. त्यांनी तो अहवाल सादर केला तो "Towards Equality" या नावाने ओळखला जातो. भारतीय समाजातील स्त्रियांच्या विदारक स्थितीपर परखडपणे प्रकाश टाकणारा हा अहवाल स्त्री विकासाच्या पुढील वाटचालीची आवश्यकता प्रतिपादन करणारा व त्यासंबंधी दिशा दाखविणारा ठरला. स्त्रियांना शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक दृष्ट्याा राजकीय दृष्ट्याा सबल करण्याची आवश्यकता शासकीय स्तरावर मान्य करण्यात आली, परिणामी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून स्त्रियांसाठी आधिकाधिक विकास योजना आखण्यात येऊन त्यांची अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

key words : पंचवार्षिक योजना, महिला, नियोजन, विकास.

प्रस्तावना:

भारतीय लोकसंख्येचा अर्धा भाग असलेल्या स्त्रियांचे विकास प्रक्रियेतील स्थान व सहभाग निश्चित करणे हे नियोजन कारांपुढील एक फार महत्वाचे आव्हान आहे. २००१ च्या जनगणने नुसार स्त्रियांची एकूण संख्या ४९५.७४ कोटी (मिलियन) इतकी होती. देशाच्या एकूण लोसंख्येच्या प्रमाणात स्त्रियांची टक्केवारी एकूण ४८.३ टक्के इतकी होती. नियोजन प्रक्रियेच्या माध्यमातून स्त्रियांना विकासाच्या वाटेकरी करवून घेण्याच्या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून २००१ च्या जनगगणना अहवालाने स्त्रियांची वर्गवारी पुढील प्रमाणे पाच उपविभागांमध्ये केली.

1.बालीका – ० ते १४ वयवर्षे गटातील बालीकांची एकूण संख्या १५९.०३ कोटी म्हणजेच ३४.६ टक्के इतकी होती. समाजातील स्त्री-पुरूष विषमता आणि लिंगभावात्मक भेदभावाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्याकडे विशेष लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

2.किशोरवयीन मुली – १५ ते १९ वयोवर्षे गटातील किशोरवयीन मुलींची संख्या ५१.३९ कोटी अर्थात १०.५ टक्के होती. नियोजनाच्या दृष्टीकोनातून स्त्रियांचा हा गट अतिशय संवेदनक्षम मानला जातो. कारण भविष्यकालीन उत्पादक आणि पुनरूत्पादक घटक म्हणून कुटूंब आणि समाजाला योगदान देण्याच्या तयारीतील हा

गट असतो.

3.पुनरूत्पादक गट – १५ ते ४४ या वयोगटातील पुनरूत्पादक स्त्रिगटातील एकूण स्त्रियांची संख्या २३०.३५ कोटी ४७.१ टक्के इतकी होती. त्यांच्या पुनउत्पादक गरजांच्या पूर्ततेसाठी त्यांची विषेश काळजी घेण्याची व त्यांच्याकडे लक्ष देण्याची आवष्यक्ता असते.

4.आर्थिक दृष्ट्या सक्रीय – १५ ते ५९ वयोवर्ष गटातील आर्थिक दृश्टया सक्रिय स्त्रियांची संख्या २८५.२२ कोटी अर्थात ५८.४ टक्के आहे. शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार, उत्पन्न निर्मिती आणि विकास प्रक्रियेतील सहभाग व निणर्य स्वातंत्र्य इ.या गटातील स्त्रियांच्या महत्वाच्या गरजा आहेत.

5.जेष्ठ स्त्रिया – वय वर्षे ६० आणि त्यापेक्षा जास्त वय असणाऱ्या ज्येष्ठ स्त्रियांची एकूण संख्या ३४.३६ कोटी म्हणजेच ७.० टक्के इतकी आहे. आरोग्याची काळजी, भावनिक आणि आर्थिक पाठींबा या त्यांच्या महत्वाच्या गरजा आहेत.[१] स्त्रियांच्या सहभागाशीवाय देशाचा विकास कधीच पूर्ण होऊ शकत नाही. स्त्रिया आणि विकास या दोन बाबी वेगवेगळया नसून त्या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एकाला एकून दुसऱ्याचा विचार करणे अशक्य व अपूर्ण आहे.

"If development has not resulted in benefits to women, it is not enough to try and give them a larger share, but it is necessary to change the nature of development itself"[2]

विकास प्रक्रीयेतील स्त्रियांचे स्थान –

विकास म्हणजे अशी परिस्थिती निर्माण करणे की, ज्या परिस्थितीमध्ये प्रत्येक व्यक्ती आपल्यातील क्षमतांचा अधिकाधिक प्रभावी रित्या उपयोग करून स्वतःचा जीवनस्तर उंचावू षकते. विकासाच्या या प्रक्रियेपासून स्त्रियांना षतकानुषतके वंचीत ठेवण्याचा इतिहास आहे. "It is also possible that not only has development missed women, but they may have been hart more in the development process and there fore experienced anti-development".[3] अनेक स्त्रीवादी अभ्यासक असे मानतात की विकास या प्रक्रीयेत स्त्रियांच्या बाबत दुयम दृष्टीकोनाचा स्वीकार केलेला आहे. "Current theories of development have been inadequate in general but particularly inadequate for women".[४]

आर्थिक विकास प्रक्रीयेपासून स्त्रिया कशा प्रकारे दूर आहेत आणि देशाच्या समग्र विकासासाठी स्त्रियांचा आर्थिक विकास होणे किती आवश्यक आहे या अतिशय महत्वपूर्ण तथ्याकडे जगात सर्वप्रथम लक्ष वेधण्याचे काम सुप्रसिध्द अर्थतज्ञ इस्टर बोसरप यांनी केले 'स्त्रिया आणि आर्थिक विकास' हा ग्रंथ त्यांनी १९७० साली लिहीला. त्यामध्ये त्यांनी मागील काही शतकांमध्ये सर्वच क्षेत्रात झालेले बदल स्त्रियांच्या जीवनावर कशा प्रकारे परिणाम करतात याची सविस्तर मांडणी केलेली आहे.

पुरूषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रियांना दुयमस्थानी ठेवल्यामुळे त्या विकासापासून वंचीत राहिल्या. सार्वजनिक क्षेत्र हे पुरूषांचे तर खाजगी क्षेत्र म्हणजे घर आणि त्यासंबंधीच्या जबाबदाऱ्या स्त्रियांच्या या समाजातील प्रस्थापित नियमांमुळे स्त्रिया शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार, वेतन, यापासून दूर फेकल्या गेल्या. परिणामी विकास प्रक्रियेची फळे त्यांच्यापर्यंत पोहचण्यास फार उशीर झाला. स्त्रियांच्या परीप्रेक्षातून 'विकास' या संकल्पनेची अतिशय व्यापक व समग्र व्याख्या जागतिक महिला दशकात कोपनहेगन येथे इ.स. १९८० मध्ये भरलेल्या जागतिक महिला परिषदेमध्ये करण्यात आली होती. स्त्रियांचा विकास होणे म्हणजे नेमके काय ते समजण्यास ही व्याख्या सहायक ठरते. त्यानुसार "Development is here interpreted to mean total development, including development in the political economic, social, cultural and other dimentions of human life as also the development of economic and other material resources and also the physical, moral, intellectual and cultural growth of human person. The improvement of the stutus of women requires a change in the attitudes and roles of both men and women. Women's development should not only be viewed as an issue in social development but should be seen as essential component in every dimention of development. To improve the status of women and their role in the process of development, such development should be an integral part of the global project for the establishment of a New International Economic order based on equity, sovereign equality, interdependence, common interst and co-operation among all states".[5] सत्तरच्या दशकामध्ये स्त्रियांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज जगभरातील सर्वच देशांना जाणवू लागली. भारतामध्ये स्त्रीप्रश्नांवर विशेष संशोधन व अभ्यास करण्यासाठी एका गटाची नेमणूक करण्यात आली. त्यांनी तो

अहवाल सादर केला तो "Towards Equality" या नावाने ओळखला जातो. भारतीय समाजातील स्त्रियांच्या विदारक स्थितीपर परखडपणे प्रकाश टाकणारा हा अहवाल स्त्री विकासाच्या पुढील वाटचालीची आवश्यकता प्रतिपादन करणारा व त्यासंबंधी दिशा दाखविणारा ठरला. स्त्रियांना शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक दृष्ट्याा राजकीय दृष्ट्याा सबल करण्याची आवश्यकता शासकीय स्तरावर मान्य करण्यात आली, परिणामी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून स्त्रियांसाठी आधिकाधिक विकास योजना आखण्यात येऊन त्यांची अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न सुरू झाले. ''भारतील महिला कल्याण कार्यक्रमाला खरा आधार मिळाला तो स्वातंत्र्यानंतर आणि तोही सरकारने राबविलेल्या पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून, १९५२ ला पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली, तेव्हापासून पुढील प्रत्येक पंचवार्षिक योजनेत महिला कल्याणासाठी विविध योजनांची तरतूद व अंमलबजावणी करण्यात आली.[६] पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून स्त्रियांच्या विकासासाठी प्रत्येक पंचवार्षिक योजनेगणित वाढत जाणारा निधी स्त्री विकासाबाबतच्या शासनाच्या सकारात्मक दृष्टीकोनाची पावतीच आहे. ''पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून किमान आरेग्य सुविधा, कुटुंब कल्याण आणि महिला बालविकासासाठी पोषण आहार, तसेच महिला शिक्षण, त्यांचा कार्यातील सहभाग व वाढ आणि गरजू महिलांना कल्याणकारी सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे.[७] थोडक्यात महिलांच्या विकासाबाबत विविध पातळ्याांवरून प्रयत्न होताना दिसून येतात.

महिला केंद्रीत नियोजन –

भारताच्या आर्थिक विकासामध्ये नियोजनाचे स्थान फार महत्वाचे आहे. आयोगाने इ.स. १९५१ पासून पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून विकासाचे शास्त्रशुध्द प्रयत्न सूरू केले. नियोजन करत असताना स्त्रियांच्या प्रश्नांना आणि विकासाला किती प्राधान्य दिले जाते हा महत्वाचा प्रश्न आहे. नियोजनाच्या सुरूवातीच्या कालखंडा मध्ये स्त्रियांचा समावेश सामाजिक कल्याण या सदरातच करण्यात आलेला होता त्यामुळे त्यांच्यासाठी स्वतंत्र अशी निधिची व्यवस्था करण्यात आलेला नव्हती. स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन 'कल्याणचा' होता. सहाजिकच नियेजनामध्ये स्त्रियांना अतिशय नगग्य स्थान दिले जात होते. ''नियोजनाच्या पहिल्या दोन दशकांत महिलांचे कार्यक्षेत्र चूल व मूल असल्याचे गृहीत धरण्यात आले होते. मात्र लोकसंख्येच्या वाढीचा वेग मोठा असल्याने तो आटोक्यात आणण्याची जबाबदारी स्त्रियांनी पत्करावी या दृष्टीने त्यांचे शिक्षण करण्यावर नियोजनात भर देयात आला.[८] स्त्रिया या देशातील लोकसंख्येचा अर्धा भाग असून आर्थिक विकासात त्यांच्या क्षमतांचा योग्य उपयोग करून घेणे देशाच्या सर्वांगीन प्रगतीच्या व जलद आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे या कडे दुर्देवाने नियोजनकारांनी सरूवातीच्या कालखंडामध्ये दुर्लक्ष केले. इ.स. १९७० साली ईस्टर बोसरप या अर्थशास्त्राज्ञ स्त्रीने संपूर्ण जगाचे लक्ष या महत्वाच्या बाबीकडे वेधले त्यासाठी तिने 'महिला आणि आर्थिक विकास' हा ग्रंथ लिहिला आणि त्यामधून आर्थिक विकासामध्ये स्त्रियांचे योगदान किती महत्वपूर्ण आहे याची मांडणी केली. तिच्या या ग्रंथाचा संपूर्ण जगभर प्रचंड परिणाम झाला आणि भारतातही नियोजन कर्त्यांना आर्थिक विकासात स्त्रियांना सामावून घेणे किती गरजेचे आहे याची प्रथम जाणिव झाली.[९] आणि त्यानंतर पंचवार्षिक योजनांमधून स्त्रियांच्या विकासाचा मुद्दा ऐरणीवर आला. ''स्त्री हा देशातील एक दुर्बल घटक असून तिच्या विकासाच्या विशेष प्रयत्नांचे महत्व पटले. देशातील अत्यंत गरीब, दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रश्न ध्यानात घेऊन त्यांना गुंतवणूकीस मदत करणे व त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांना उत्पादक घटक व नवे तंत्रज्ञान उपलब्ध करून घेणे यावर नियोजनात भर देण्यात आला पाहिजे.''[१०] हे तत्व मान्य करण्यात आले. ''स्त्रिया हा केवळ दुर्बल गट समजून त्यांच्या कल्याणाची काळजी वाटणे पुरेसे नाही. त्यांची श्रमशक्ती व कौशल्य हे आर्थिक विकासाचे महत्वाचे साधन आहे आणि त्याचा योग्य वापर करण्यावर नियोजनाचे भवितव्य अवलंबून आहे.''[११] या अतिशय महत्वाच्या वैचारिक क्रांतीमुळे पंचवार्षिक योजनांची आखणी करतांना स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवले जाऊ लागले. सन २००२ – २००३ या आर्थिक वर्षापासून महिलांना केंद्रीभूत मानून नियोजन केले जाईल असे पंचवार्षिक योजनाचा कागदपत्रामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले.

१) महिलांना सक्षम करण्याकरीता कोणती धोरणे, योजना आणि कार्यक्रम राबविण्यात येणार, त्याकरीता किती निधी देण्यात येणार आणि त्याचा महिलांवर कोणता परिणाम होणार हे शासनाचा प्रत्येक विभाग त्याच्या कार्यक्रम अंदाजपत्रकात महिलांचे सक्षमीकरण या प्रकरणात स्पष्ट करतील.
२) शासकीय योजनांच्या व कार्यक्रमाच्या आखणीत, नियोजनात आणि अंमलकबजावणीत प्रत्येक स्तरावर महिलांना सहभागी करून घेतले जाईल व याचाही महिलांचे सक्षमीकरण या प्रकरणात करण्यात येईल.
३) यापुढे सामाजिक आणि आर्थिक दर्जाचे विश्लेषण करतांना पुरूष व स्त्री अशी स्वतंत्र विभागणी दर्शविण्यात येईल.
४) अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया सुरू असताना महिला संघटनांशी विचार विनियम करण्यात येईल.
५) राष्ट्रीय उत्पनाच्या आकडेवारीमध्ये महिलांच्या घरकामाच्या मूल्याचा समावेश केला जावा अशी शिफारस राज्य शासन केंद्र शासनाला करील.

६) आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात महिलांच्या सक्षमीकरणाला देशाच्या आर्थिक विकासात अतिशय महत्वाचे योगदान आहे. पण या योगदानाचे पुरेसे मूल्यमापन होत नसल्यामुळे त्यांचे आर्थिक पैलू ठळकपणे स्पष्ट होत नाहीत, म्हणून याकरीता पुरेसा निधी उपलब्ध होत नाही अशा प्रकारचे मूल्यमापन नियोजनाचा भाग म्हणून नियमितपणे करण्यात येईल.

७) सर्व नागरी आणि ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्था सर्व स्तरावरील वार्षिक आणि पंचवार्षिक महिला सक्षमीकरण योजना तयार करतील.[१२]

समारोप :

भारताच्या नियोजन प्रक्रियेमध्ये स्त्रियांना केंद्रीभूत मानून नियोजन करण्याची पध्दती दिवसेंदिवस अधिकाधिक विकसित होतांना दिसून येते आहे. जेंडर बजेट सारख्या नवनवीन संकल्पना त्याचाच परीपाक आहेत. नियोजनाचा स्त्रियांप्रती हा सकारात्मक दृष्टीकोन पंचवार्षिक योजनांमधून पाहावयास मिळतो. ''स्त्रियांच्या प्रगतीला चालना देण्यासाठी आजवर पंचवार्षिक योजनांमध्ये शिक्षण, आरोग्य समाजकल्याण आदी क्षेत्रांत विविध कार्यक्रम आखण्यात आले आहेत. प्रथम महिला कल्याण ही संकल्पना या कार्यक्रमाच्या आखणीमधील प्रेरणा होती. हळूहळू १९७० नंतर महिला विकास हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट ठरविले गेले. १९७५ आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून मानले गेले, त्यावेळी स्त्रियांच्या विकासासाठी निश्चित कार्यक्रम आखण्यावर व त्यांच्यावरील सामाजिक व आर्थिक अन्याय दूर करण्यावर भर देण्यात आला. त्याचबरोबर महिला विकास कार्यक्रमात सातत्य राहावे म्हणून खास शासकीय यंत्रणा स्थापन केली गेली.[१३]थोडक्यात नियोजनाच्या माध्यमातून स्त्रियांच्या विकासाकडे अधिकाधिक लक्ष देण्याचे प्रयत्न शासकीय स्तरावरून होत आहेत.

संदर्भ:

१) जनगणना अहवाल २००१

२) पवार शरद, महिलांना सामाजिक प्रतिष्ठा संधी व निर्णयाच्या प्रक्रियेत सहभाग देऊ इच्छिणारे व्यापक धोरण, लोकराज्य, जुलै १९९४, पृ. ३५

३) Krishana Raj Maithreyi, women and Develipment, shubhade saraswat prakashan, Pune , 1988, p. 8

४) Krishana Raj Maithreyi, women and Develipment, shubhade saraswat prakashan, Pune , 1988,p. 14

५) Ibid-p.15

६) Ibid-p.15

७) Ibid-p.15

८) ७ वी योजना, योजना १६ जाने १५ फेब्रुवारी १९८४, अंक १२,१३, पृ. २०

९) पंडीत नलिनी, स्त्रिया आणि आर्थिक विकास, अर्थसंवाद जानेवारी-मार्च १९८९, खंडतर, अंक-४ पृ. २

१०) उपरोक्त

११) उपरोक्त

१२) उपरोक्त पृ. १

१३) उपरोक्त पृ.१०